महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
बांधकाम भवन, २५,मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१ .

दूरध्वनी क्र. :- ०२२-२२०१३७८१ Email ID : sangeeta.kholgadge@nic.in

क्रमांक: - संकीर्ण-२०२०/प्र.क्र.९९/आस्था-८ दिनांक :- २४ ऑगस्ट, २०२१.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
ठाणे जिल्हा परिषद,
ठाणे.

विषय :- ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेकडील गट-क संवर्गातील आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती.

संदर्भ : १) शासन निर्णय समक्रमांक , दिनांक १४ जून,२०२१
२) शासन पत्र समक्रमांक दिनांक ०५ जुलै,२०२१
३) शासन पत्र समक्रमांक दिनांक ३० जुलै,२०२१.
४) आपले क्र.ठाजिप/आवि/आस्था-३/४/भरती/वशि/७७१/२०२१, दि.१०.०८.२०२१ चे पत्र.
५) शासन शुध्दीपत्रक,समक्रमांक दिनांक २० ऑगस्ट, २०२१.
६) आपले क्र.ठाजिप/आवि/आस्था-३/४/भरती/वशि/८९१/२०२१, दि.२४.०८.२०२१ चे पत्र.

महोदय,

विषयांकित प्रकरणी आपल्या संदर्भाधीन दि .२४.०८.२०२१ च्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, जिल्हा परिषदेकडील माहे मार्च, २०१९ पदभरतीची कार्यवाही करताना डिसेंबर, २०१९ पर्यंतची रिक्त पदे भरतीसाठी विचारांत घेण्यात आली होती.

२. ठाणे जिल्हा परिषदेत आरोग्य सेविका ( पेसा क्षेत्रात) ३८ वाढीव पदांची भरती करताना, सदरची वाढीव ३८ पदे माहे मार्च , २०१९ च्या जाहिरातीतील रिक्त पदांव्यतिरिक्त नसल्याबाबतची खातरजमा करुन तसेच सदर पदभरतीसाठी पुन:श्च जाहिरात प्रसिध्द करता

(कृ.मा.प.)

येणार नाही, **या अटींच्या अधीन राहून** आपल्या दि.१०.०८.२०२१ च्या पत्रातील अभिप्रायास अनुसरुन, आरोग्य सेविका (पेसा) या संवर्गात ४४ या पदांमध्ये ३८ पदांची वाढ करुन एकूण ८२ पदांची भरती करण्यास तसेच आरोग्य पर्यवेक्षक या संवर्गातील खुल्या (सर्वसाधारण) प्रवर्गातून एक पद कमी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

आपला,

( डॉ. वसंत माने )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत** :- १. राज्यस्तरीय नोडल अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), कोकण विभाग,नवी मुंबई.
२.व्हाईस प्रेसिडेंट, बिझनेस डेव्हलपमेंट, मे. न्यास कम्युनिकेशन प्रा.लि.(एनसीपीएल), ५०४, दलामल टॉवर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
३.निवड नस्ती (आस्था-८).